फेब्रुवारी २००३

# नवीन आदर्श उपविधी व शासकीय लेखा परिक्षणाचे आदेश हे जबरदस्तीने लादुन स्विकारता येणार नाही.

राज्याचे सहकार आयुक्त श्री. रत्नाकर गायकवाड यांनी दिनांक १८/०९/२००२ व दिनांक १०/१२/२००२ रोजी शासकीय लेखापरिक्षण व सुधारीत आदर्श उपविधीचे आदेश लागू करण्याचे सक्त आदेश सहकार खात्याच्या संबंधित विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक व उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना यापूर्वीच दिलेले आहे. या दोन्ही आदेशांची गेली दिड वर्षांपासून विविध स्तरावर चर्चा झाल्याचे मा. सहकार आयुक्तांचे म्हणणे आहे. आणि ह्या बाबत प्राप्त केलेल्या माहितीनुसार वस्तुस्थिती तशी नसल्याचे निष्पन्न झाले आहे. वास्तविक या दोन्ही विषयांसाठी रिझर्व्ह बँक, नाबार्ड, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, विभागीय मंडळे, जिल्हा सहकारी बोर्ड, अर्बन बँक व पतसंस्थांची सर्व फेडरेशन्स् व असोसिएशन, विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सर्व जिल्हा बँका यांची एकत्रीत बैठक बोलावून सर्व स्तरावर चर्चा करणे आवश्यक होते. एवढेच नव्हे तर या दोन्ही विषयाचा कच्चा मसुदा वरील सर्व संबधित व राज्यातील सर्व नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी संस्थांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व त्यावर संबंधितांची मते / अभिप्राय /कल्पना/हरकती मागविणे अत्यावश्यक होते. यापैकी मा. सहकार आयुक्तांनी काहीही केलेले नाही. केवळ महाराष्ट्र राज्यातील पतसंस्था फेडरेशन बरोबर चर्चा केल्याचे व त्यामुळे हे आदेश काढल्याचे मा. सहकार आयुक्तांनी दिनांक १० फेब्रुवारी २००३ रोजी दु. ३.३० वाजता मला व महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे संचालक यांना सांगितले.

या दोन्ही विषयांच्या आदेशामध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व सहकारी संस्था नियम १९६१ च्या विरोधात अनेक गोष्टी असल्याचे मा. सहकार आयुक्तांच्या निदर्शनास आणून देखील त्यांनी या आदेशास स्थगिती देण्यास असमर्थतता व्यक्त केलेली आहे. कायद्याच्या विरोधात ज्या गोष्टींचा या आदेशात समावेश झालेला आहे, त्यालाही त्यांनी मान्यता दिलेली आहे. व हे बेकायदेशीर कृत्य त्यांच्या हातुन झाल्याचे त्यांनी सर्वांसमोर कबुल केले आहे. आणि एवढे असुनही राज्यातील १४ हजारांच्या वर नागरी/ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना पुर्णपणे वेठीस पकडून दहशतीचे व घबराटीचे वातावरण तयार झालेले आहे. आदेशामध्ये जर काही कायद्याच्या विरोधातील बाबी समाविष्ट असतील, तर हे आदेश इतर योग्य गोष्टींसोबत पतसंस्थांनी स्विकारावे ही बाब मा. सहकार आयुक्तांनी उपलब्ध कायदा हातात घेण्याचा प्रकार आहे. हे ही मा. सहकार आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.

नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका यांच्या प्रमाणे की, ज्यांना बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ लागू आहे. त्याप्रमाणे पतसंस्थांचा कारभार व्हावा ह्या उद्देशाचे हे आदेश आहेत. परंतु हे करीत असताना पतसंस्थांना लोकॉस्ट डिपॉझीट उभारणे, चेकची सुविधा उपलब्ध करुन देणे, डिपॉझीटवर गॅरंटी

(विमा) शासनानेच देणे हे अनेक वेळा मागणी करुनही संबंधितांनी त्यास मान्यता दिलेली नाही. आणि त्यामुळे तरलतेपोटी गुंतवणूक, थकव्याज तरतूद, शिडी रेशो, एक्सपोजर लिमीट, उपलब्ध निधीचा विनियोग, तारणी व विनातारणी कर्ज, व्याजदर, व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाचे प्रमाण, कर्जव्यवहार व वसुल भागभांडवल, ठेवीतील वाढ, कर्जे, थकीत कर्जाची वसुली, व्यवस्थापनाची कार्यक्षमता व कार्यतत्परता, गुंतवणुका, संशयीत बुडीत फंड तरतुद इत्यादी महत्वाची बाबींची संकल्पना ताबडतोब  स्विकारणे हे न उलगडणारे कोडे आहे.

मा. सहकार आयुक्तांना या प्रसंगी नैसर्गिक न्याय देण्याची व या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी त्यावर व्यापक स्वरुपात विचार मंथन करण्याची गरज असुन ही संकल्पना काही कालावधी लोटल्यानंतर चालू करावीच लागेल, हे सांगूनही मा. सहकार आयुक्तांचा अट्टाहास न समजण्यासारखा वाटतो. कारण आदेशामध्ये झालेली चुक निदर्शनास आणून दिल्या ती मान्य करुनही हे दोन्ही आदेश का स्थगित केले जात नाही, हे न उलगडणारे कोडे राज्यातील लाखो सहकारी कार्यकर्त्यांना आश्चर्यजनक परिस्थितीत घेवून जातात.

महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांना मार्गदर्शन करणाऱ्या एखाद्या दुसऱ्या फेडरेशनचा अपवाद सोडला तर इतर ९० टक्के सर्व फेडरेशननी विरोध दर्शविला आहे. व त्यासाठी राज्यभर मा. सहकार आयुक्तांच्या या कृतीबद्दल विरोध व्यक्त केले जात आहेत. पतसंस्थांमधील संचालक व अधिकारी /कर्मचारी यांना शिक्षण , प्रशिक्षण दिल्याशिवाय अशा प्रकारच्या आदेशाची संकल्पना आत्मसात होऊ शकत नाही. व नैसर्गिक न्याय म्हणून या देशाच्या घटनेप्रमाणे प्रत्येकाला प्रथम संधी देण्यासाठी कालावधीची मर्यादा वाढवून दिलीच पाहिजे. असा हा आग्रह घटनेनेच प्रत्येकाला दिला आहे. परंतू मा. सहकार आयुक्त यांचा ह्या प्रकरणी असलेला अंमलबजावणीच्या कालावधीचा अट्टाहास अनाकलनीय आहे.

राज्यातील नागरी/ग्रामिणबिगरशेती सहकारी पतसंस्थांनी हे आदर्श उपविधी घाईने स्विकारु नये अशी भावना संपूर्ण राज्यात आहे. परंतु दुसऱ्या बाजूस मा. सहकार आयुक्तांच्या आदेशाची भिती व सहकारी कार्यकर्त्यांना निश्चितपणे द्विधा परिस्थितीत घेऊन जात आहे. वास्तविक असे आदेश मा. सहकार आयुक्त लादू शकत नाही हे कायद्यानेच अनेकवेळा सिध्द केले आहे. यासाठी सहकारातील एका सेक्टरच्या उपविधीसाठी बायलॉज लादण्याचा प्रयत्न त्यापूर्वी झालेला होता. त्यासंदर्भात जो निकाल झालेला आहे त्याचा घोषवारा इंग्रजीमध्ये खाली देत आहे.

“ Some of the general consideration may be noted as emanating from recent judegements. It must be noted that bye-laws are in nature like Articles of Association and can not have statutory force. (2000 Mh Co-op. J (O.S.) pg. 165 Talamakini Wadi CHS Ltd. v. Dist. Joint Registrar) Right to contest and vote at election is not a fundamental right but is Governed by the statute, which confers the same. ( 2000 MH Co-op L J(appeal) pg. 279 Sambha v. Co-operatives) Further, society has to decide what is in its interest. Society can not be directed or forced to amend bye - laws by Registrar or State Government. Circulars issued in the case were quashed. It was also observed that, Registrar or State Government can issue direction in public interest but. the society has to be left alone to decide its own interest. (2000 (suppl) BOM. C.R. pg 864 (SCC) State of Maharashtra v. K.S.G. R.S.M.)”

या विषयावर ''**पतसंस्था परिवार**'' मधुन तसेच अनेक कार्यक्रमामधून यापूर्वी विचार व्यक्त केलेले आहेतच. परंतु या क्षणी मा. सहकार आयुक्तांनी हे दोन्ही आदेश की, ज्या आदेशांमध्ये अनेक बाबी कायद्याच्या विरोधात आहेत, शिवाय अनेक बाबीमध्ये पतसंस्थांची चळवळ सदृढ होण्याच्या ऐवजी अडचणीत येईल, तसेच नवीन अनावश्यक व न परवडणाऱ्या सर्वश्रृत खर्चीक बाबीला स्त:हून निमंत्रण देण्याचा हा प्रकार थांबविण्यासाठी हे आदेश रद्द करावेत. व तसे मा. सहकार आयुक्तांना राज्यकर्त्यांनी आदेश द्यावेत, यासाठी हे निवेदन आहे. तसेच या दोन्ही आदेशांची मुळ कल्पना यशस्वी होण्यासाठी राज्यस्तरावर मागे म्हटल्याप्रमाणे संबंधितांची त्वरीत बैठक बोलावून विस्तृतपणे चर्चा होऊन पुन्हा कच्चा मसुदा तयार करुन व सर्वांसाठी हे चर्चेचे दालन खुले करुन हा निर्णय घेण्यात यावा. व पतसंस्थांना न्याय देण्यात यावा हे ह्या निमित्ताने आवाहन करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**